मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जनरल मोटर्स प्रकल्पातील कामगारांच्या ठामपणे पाठिशी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## जनरल मोटर्सला वाढीव भरपाईबाबत निर्देश




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** तळेगाव दाभाडे (जि. पुणे) येथील जनरल मोटर्सच्या बंद झालेल्या प्रकल्पातील कामगारांच्या पाठिशी शासन ठामपणे उभे राहील. तसेच हा प्रकल्प घेणाऱ्या ह्युंदाई कंपनीकडे रोजगार संधीसाठी पाठपुरावा केला जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. जनरल मोटर्सचा हा प्रकल्प ह्युंदाई कंपनीने खरेदी केला आहे. यातील कामगारांना जनरल मोटर्सने समाधानकारक भरपाई द्यावी तसेच काही कामगारांना ह्युंदाई कंपनीने सेवेत सामावून घ्यावे, या मागणीसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या या बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, माजी आमदार बाळा भेगडे, कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा तसेच जनरल मोटर्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, कामगार संघटनेचे पदाधिकारी, कामगार आदी उपस्थित होते. जनरल मोटर्सच्या प्रकल्पातील १ हजार ५७८ कामगारांपैकी सुमारे ६९६ कामगारांनी भरपाईची रक्कम स्वीकारून स्वेच्छेने काम सोडल्याची माहिती यावेळी देण्यात आली. उर्वरित कामगारांची वाढीव भरपाई, तर काहींची ह्युंदाईने सेवेत घ्यावी, अशी मागणी आहे. त्यावर उर्वरित कामगारांच्या वाढीव भरपाईच्या मागणीबाबत जनरल मोटर्सच्या व्यवस्थापनाने फेरविचार करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

ह्युंदाई हा प्रकल्प २०२५ मध्ये सुरू करणार आहे. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी शासन म्हणून त्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. हा प्रकल्प देखील मोठ्या रोजगार संधी उपलब्ध करून देणारा आहे. त्यामुळे भरपाई मान्य नसलेल्या आणि कुशल, अर्धकुशल अशा कामगारांना प्राधान्याने सेवेत घ्यावे यासाठी आवश्यक असा पाठपुरावा केला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले.

# अश्विनी जगताप यांना गैरसमज झाला होता

## भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे स्पष्टीकरण

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना डावललं जात असल्याची चर्चा पिंपरी-चिंचवड शहरात रंगली होती. अखेर यावर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पडदा टाकला आहे. आमच्या पक्षात कोणीही नाराज नाही. आम्ही पक्ष म्हणून एकत्र आहोत, पक्ष म्हटले की समज गैरसमज होत असतात, असं त्यांनी म्हटलं आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होते. चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी गेल्या आठवड्यात भाजपच्या पत्रकार परिषदेत भाजप पदाधिकाऱ्याला पत्रकारांच्या समोर चांगलंच खडसावले होतं. त्यामुळे





भाजपमध्ये विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांना डावलं जात असल्याची चर्चा रंगली होती. अखेर यावर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अश्विनी लक्ष्मण

जगताप यांना गैरसमज झाला होता म्हणून त्यांच्याकडून काही शब्द अनवधानाने गेले होते. त्या पदाधिकाऱ्याने देखील काही शब्द काढला नाही, त्या वडीलधाऱ्या आहेत, पक्ष म्हटलं की समज-गैरसमज असतात. आम्ही सर्व एकत्र आहोत,असे शंकर जगताप म्हणाले. भाजपमध्ये निष्ठावंत नाराज नाहीत. उलट कार्यकारणीत निष्ठावंतांना सर्वात जास्त पदे देण्यात आली आहेत. परंतु, पक्ष संघटना म्हटलं की, नाराजी येते, त्यांची नाराजी दूर करण्याचा मी प्रयत्न करेल, असं देखील शंकर जगताप यांनी म्हटलं आहे. आमदारकी बाबत पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील तो मला मान्य असेल, असेही ते म्हणाले.

# चिंचवड, देहूरोड स्थानकांचा कायापालट!

## रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम वेगाने सुरू

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मध्य रेल्वेच्या पुणे विभागाकडून चिंचवड, देहूरोड आणि उरुळी या रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम वेगाने सुरू आहे. चिंचवड स्थानकासाठी २०.४० कोटी रुपये, देहूरोड स्थानकासाठी ८.०५ आणि उरुळी स्थानकासाठी १२.८७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अमृत भारत रेल्वे योजनेंतर्गत हे काम करण्यात येत आहे. अमृत भारत रेल्वे योजनेंतर्गत पुणे विभागातील १६ स्थानकांचा विकास केला जात आहे. प्रत्येक स्थानकाचा विकास करताना तेथील दैनंदिन सरासरी प्रवासी संख्या लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले आहे.



त्याबरोबरच स्थानकाची सध्याची रचनाही विचारात घेतली गेली आहे. दूरदृष्टीने स्थानकांचा विकास करण्यावर भर दिला जात आहे. प्रामुख्याने प्रवासीकेंद्रित सुविधा स्थानकांवर विकसित केल्या जात आहेत. स्थानकाच्या बाह्य रूपासोबत अंतर्गत भागातही सुधारणा करण्यात येत आहेत. चिंचवड स्थानकातील फलाटांवर आच्छादन बसविण्याचे प्रगतिपथावर आहे. याचबरोबर स्वच्छतागृहे बांधण्यासाठी पायाभरणीचे कामही सुरू आहे. देहूरोड स्थानकावरही फलाटांवर आच्छादन बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. उरुळी स्थानकाच्या पुनर्विकासाचे कामही वेगाने सुरू आहे. स्थानकात खोदकाम करून पायाभरणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. याचबरोबर स्वच्छतागृह उभारणीचे काम सुरू आहे. स्थानकाभोवतीच्या परिसराचे काम केले जाणार आहे. याचबरोबर प्रवेशद्वाराचीही उभारणी केली जाईल. स्थानकात नवीन वाहनतळ केला जाणार आहे. तसेच, फलाटांवर आच्छादनही बसविले जाणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे. कोल्हापूर स्थानकाच्या पुनर्विकासाठी ४३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. स्थानकात जुने बांधकाम पाडण्यात आले आहे. तिथे खोदकाम करून पायाभरणीचे काम सुरू आहे. स्थानकाला नवीन दोन प्रवेशद्वार असणार आहेत. याचबरोबर स्थानकात दोन लिफ्ट आणि दोन एस्केलेटर बसविण्यात येणार आहेत. स्थानकातील सर्व फलाटांवर आच्छादन बसविण्यात येणार आहे. स्थानकावर प्रवाशांसाठी प्रतीक्षालयाची उभारणीही केली जाणार आहे.

### स्वच्छतागृह उभारणीचे काम सुरू

» चिंचवड स्थानकातील फलाटांवर आच्छादन बसविण्याचे प्रगतिपथावर आहे. याचबरोबर स्वच्छतागृहे बांधण्यासाठी पायाभरणीचे कामही सुरू आहे. देहूरोड स्थानकावरही फलाटांवर आच्छादन बसविण्याचे काम वेगाने सुरू आहे. उरुळी स्थानकाच्या पुनर्विकासाचे कामही वेगाने सुरू आहे. स्थानकात खोदकाम करून पायाभरणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. याचबरोबर स्वच्छतागृह उभारणीचे काम सुरू आहे. स्थानकाभोवतीच्या परिसराचे काम केले जाणार आहे. याचबरोबर प्रवेशद्वाराचीही उभारणी केली जाईल. स्थानकात नवीन वाहनतळ केला जाणार आहे. तसेच, फलाटांवर आच्छादनही बसविले जाणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

# दुचाकींसाठी नोंदणी क्रमांकाची नवीन मालिका सुरू!

## वाहन क्रमांक आरक्षित केल्याचे संदेश मोबाईलवर

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे लवकरच दुचाकी वाहनांसाठी 'एलडी ही नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक तीनपट शुल्क भरून चारचाकी वाहनांसाठी राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांक दुचाकींसाठी ठेवण्याबाबत आगाऊ अर्ज स्वीकारण्याची व लिलाव कार्यपद्धतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित तीनपट शुल्क भरून हवे असतील अशा चारचाकी वाहन मालकांनी १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज करावा. उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक दुचाकी वाहनांसाठी आरक्षित करण्यासाठी २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २.३० वा. विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.अर्ज कार्यालयाच्या नवीन वाहन नोंदणी विभागात धनाकर्ष (डीडी), पत्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह आधारकार्डला लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकासह जमा करावा. हा डीडी 'डी.वाय.आर. टी.ओ., पिंपरी चिंचवड'




यांच्या नावे राष्ट्रीयकृत, अनुसूचित बँकेचा पुणे येथील असावा. अर्जदाराने ओळख पटविण्यासाठी अर्जासोबत फोटो ओळखपत्र तसेच पत्याच्या पुराव्यासाठी आधारकार्ड, दूरध्वनी देयक आदींची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

त्याच त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संबंधीत अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दीष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. दुचाकीची यादी २३ ऑक्टोबर रोजी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. दुचाकीसाठी अर्जदारांना लिलावाकरीता जास्त रकमेचा डीडी जमा करावयाचा असल्यास २३ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० पर्यंत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या कक्षात नोंदणी प्राधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केलेल्या अर्जदारास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे. वाहन क्रमांक आरक्षित केल्याचे संदेश मोबाईलवर आल्यानंतर पाचव्या दिवशी पावती कार्यालयातून मिळणार आहे. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व शुल्क सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नाही. आकर्षक क्रमांकाचे शुल्कामध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे विहीत केलेले शुल्क लागू करण्यात येणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे.

# पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पळविले!

## आमदार रवींद्र धंगेकरांचा पुणे पोलिसांवर गंभीर आरोप

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ड्रग्ज उत्पादन आणि तस्करीचे गंभीर आरोप असलेल्या ललित पाटीलला मुंबई पोलिसांनी अटक केली. यानंतर त्याने कोर्टात हजर केलं जात असताना मी ससून रुग्णालयातून पळून गेलो नाही, तर मला पळवून लावण्यात आलं, असा गंभीर आरोप केला. यावर या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या पुण्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली. रविंद्र धंगेकर म्हणाले, ललित पाटीलचा तुरुंग ते पंचतारांकित हॉटेल असा प्रवास महिनोंमहिने सुरू होता. आज पुणे शहर अमली पदार्थाने वेढलं आहे. अनेक तरुण



व्यसनाधीन झाले आहेत. ललित पाटील केवळ पुण्यापुरता मर्यादित नव्हता. तो महाराष्ट्रभर आणि भारताच्या सीमेपर्यंत हे काळेधंदे करत होता. त्याचे मोठे कारखानेही उद्धवस्त झालेले आपण पाहिले. या प्रकरणात पुणे पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पंचतारांकित सेवा दिली आणि पळून जाण्यासाठी मदत केली. हे इथंच थांबलं नाही, तर १५ दिवस तो सापडत नव्हता. पुणे पोलिसांचे १० पथकं वेगवेगळ्या भागात पाठवण्यात आले. परंतु, आजी-माजी पोलीस अधिकारी ललित पाटीलबरोबर आहेत हे मी पहिल्या दिवसापासून सांगत होतो. तो हा व्यवसाय एकटा करत नव्हता. त्याला पोलिसांचा वरदहस्त होता, असा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला. रविंद्र धंगेकर पुढे म्हणाले, कोट्यावधी रुपयांच्या अमली पदार्थांचा काळाधंदा करणारा ललित पाटील सापडला, पण मुंबई पोलिसांना सापडला. म्हणजेच कुठल्यातरी पोलिसाने त्याला मॅनेज करून तिथं थांबवलं आणि तिथून त्याला अटक केली. हे मुंबई पोलीस व पुणे पोलिसांचे अपयश आहे. हा अचानक पहाटे सापडतो, कोणता पोलीस पहाटे उठतो. पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पळवून लावण्यासाठी प्रयत्न केले. यात पुणे पोलिसांचं अपयश आहे. कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ विकणारा राजरोसपणे फिरतो कसा? पोलिसांनी त्याला पळून जाण्यासाठी मदत केली ही वस्तूस्थिती आहे. सर्वांनी त्याचा व्हिडीओ पाहिला आहे. तो मुंबई पोलिसांना सापडला म्हणजे त्याची पाळंमुळं अनेक अधिकाऱ्यांपर्यंत पोहचली आहेत. याचा तपास पुणे पोलिसांकडूनही होणार नाही आणि मुंबई पोलिसांकडूनही होणार नाही. त्याचा तपास सीआयडीकडे द्यावा, अशी मागणी धंगेकरांनी केली.

### पोलिसांची भूमिका संशयास्पद

» या प्रकरणात पुणे पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पंचतारांकित सेवा दिली आणि पळून जाण्यासाठी मदत केली. हे इथंच थांबलं नाही, तर १५ दिवस तो सापडत नव्हता. पुणे पोलिसांचे १० पथकं वेगवेगळ्या भागात पाठवण्यात आले. परंतु, आजी-माजी पोलीस अधिकारी ललित पाटीलबरोबर आहेत हे मी पहिल्या दिवसापासून सांगत होतो. तो हा व्यवसाय एकटा करत नव्हता. त्याला पोलिसांचा वरदहस्त होता, असा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला.

# आता अनेकांची तोंडं बंद होणार : गृहमंत्री देवेंद्र फडणवीस

## कारवाईतून आम्ही एक मोठं ड्रग्जचं जाळं उघड करू

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** ड्रग्ज उत्पादन आणि तस्करीचे गंभीर आरोप असलेल्या ललित पाटीलला मुंबई पोलिसांनी अटक केली. यानंतर आता गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पहिली प्रतिक्रिया दिली. आता ललित पाटील हातात आला आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच यामुळे अनेकांची तोंडं बंद होणार आहेत, असं सूचक वक्तव्य केलं. ते बुधवारी (१८ ऑक्टोबर) पुण्यात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही पोलिसांना ड्रग्जच्या रॅकेटवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार




पोलीस दलाचे सर्व युनिट कामाला लागले आहेत. याच दरम्यान, मुंबई पोलिसांना नाशिकमधील ड्रग्जच्या कारखान्याची माहिती मिळाली. त्या कारखान्यावर पोलिसांनी धाड टाकली. वेगवेगळ्या ठिकाणी जे लोक असं काम करतात त्यांच्यावरही धाड टाकण्यात आली. आता ललित पाटील हातात आला आहे. त्यातून निश्चितपणे एक मोठं ड्रग्जचं जाळं बाहेर येईल. काही गोष्टी ज्या मला आत्ता समजल्या आहेत त्या मी लगेच माध्यमांना सांगू शकत नाही. मी योग्यवेळी सांगेन. पण एवढंच सांगतो की, या कारवाईतून आम्ही एक मोठं ड्रग्जचं जाळं उघड करू, असं मत देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केलं. मी पळालो नाही, मला पळवलं आहे या ललित पाटीलच्या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते सगळंच बाहेर येणार आहे. पोलिसांच्या या कारवाईतून एक मोठं जाळं बाहेर येणार आहे. तसेच बोलणाऱ्या अनेकांची तोंडं बंद होणार आहेत. आता ललित पाटील सापडल्यानंतर तो काय बोलतो यापेक्षा जे ड्रग्जचं जाळं बाहेर येणार आहे त्यावरून अनेकांची तोंडं बंद होणार आहे. ससून रुग्णालयावर गुन्हेगारांच्या मुदती वाढवून देण्यात आल्याचा आणि चुकीची प्रमाणपत्र तयार करण्यात आल्याचा आरोप आहे. त्या आरोपांची चौकशी सुरू आहे. कुणालाही सोडणार नाही. सर्व दोषींवर कारवाई केली जाईल, असंही फडणवीसांनी नमूद केलं.

### मी पळालो नाही, मला पळवलं

» मी पळालो नाही, मला पळवलं आहे या ललित पाटीलच्या वक्तव्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते सगळंच बाहेर येणार आहे. पोलिसांच्या या कारवाईतून एक मोठं जाळं बाहेर येणार आहे. तसेच बोलणाऱ्या अनेकांची तोंडं बंद होणार आहेत. आता ललित पाटील सापडल्यानंतर तो काय बोलतो यापेक्षा जे ड्रग्जचं जाळं बाहेर येणार आहे त्यावरून अनेकांची तोंडं बंद होणार आहे.

# मेट्रोसाठी पाच मीटरची राखीव लेन!

## रेल्वेचे तीन उड्डाणपूल प्रारूप अहवालात केले प्रस्तावित

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हाती घेतलेल्या रिंगरोड प्रकल्पात मेट्रोसाठी पाच मीटरची राखीव लेन, १० बोगदे, १७ उड्डाणपूल, रेल्वेचे तीन उड्डाणपूल प्रारूप अहवालात प्रस्तावित केले आहेत. रिंगरोडची रुंदी ६५ मीटर रुंद आणि अंतर ८३.१२ किलोमीटर असेल. प्रादेशिक विकास आराखड्यातील रिंगरोड विकसित करण्याचा निर्णय पीएमआरडीएने यापूर्वीच घेतला आहे. आधी एकूण अंतर १२३.९७ किमी, तर रुंदी ९० मीटर इतकी होती. मध्यंतरी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी)



रिंगरोडप्रमाणेच रुंदी ११० मीटर करण्याचा निर्णय झाला होता. परंतु या दोन्ही रिंगरोडमध्ये केवळ सुमारे १५ किलोमीटरचे अंतर आहे. काही गावांमध्ये ते ओव्हरलॅप होतात. अशा गावांमधील एमएसआरडीसीच्या रिंगरोडचा सुमारे ३८.३४ किलोमीटरचा भाग वगळण्याचा निर्णय यापूर्वी झाला होता. मध्यंतरी तो पुन्हा एमएसआरडीसीकडे वर्ग करण्यात आला. त्यामुळे पीएमआरडीएच्या रिंगरोडचे अंतर ८३.१२ किलोमीटर करण्याचा निर्णय झाला. रिंगरोड १९८७ च्या प्रादेशिक आराखड्यातील आहे. दरम्यानच्या कालावधीत या रस्त्यावर अनेक ठिकाणी बांधकामांना परवानग्या देण्यात आल्या. त्यामुळे भूसंपादनात अनेक अडचणी येणार असून खर्चही वाढण्याची शक्यता आहे. याशिवाय प्रकल्पालाच मोठा विरोध होत आहे. रिंगरोडसाठी निधी उपलब्ध करून देण्यास सरकार तयार नाही. तसेच रिंगरोडपासून १५ किलोमीटर अंतरावरूनच एमएसआरडीसीचा सुमारे


> “पीएमआरडीएने हाती घेतलेल्या रिंगरोडचा प्रारूप अहवाल सल्लागार कंपनीकडून सादर झाला आहे. विकास आराखड्यातही हा रिंगरोड दर्शविण्यात आला आहे. विकास आराखड्यास मान्यता मिळाल्यानंतर तातडीने काम हाती घेणे शक्य होणार आहे.
>
> **- अशोक भालकर,**
> मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग

११० अंतराचा रिंगरोड जाणार आहे. त्यामुळे एवढ्या कमी अंतरावरून जाणारे दोन्ही रिंगरोड एकाच रुंदीचे करणे योग्य होणार नाही असे मत पडले. त्यानंतर रिंगरोडची रुंदी ११० वरून ६५ मीटर करण्याचा निर्णय झाला. त्यास राज्य सरकारनेही मान्यता दिली. त्यानुसार नव्याने सर्वंकष अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम निविदा काढून सल्लागार कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीने रिंगरोडचा प्रारूप अहवाल सादर केला. पीएमआरडीकडून हद्दीचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. तो अंतिम मान्यतेच्या टप्प्यात आहे. त्यामध्ये रिंगरोडचा समावेश करण्यात आला आहे.

# आता गवताळ प्रदेशातही पर्यटन होणार!

## राज्यातील ‘हा’ पहिलाच प्रयोग पुणे, सोलापूर जिल्ह्यात

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्रात पहिल्यांदाच पुणे आणि सोलापूर जिल्ह्यात गवताळ सफारी सुरू करण्यात येत आहे. बारामती आणि इंदापूर तालुक्यात तो सुरू होण्याची शक्यता आहे. पुणे वनविभागाच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. मंगळवारी, १७ ऑक्टोबरला या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. नागरिकांसाठी येत्या १८ ऑक्टोबरपासून सफारी नोंदणी सुरू होत आहे. यासंदर्भात वनविभागाने एक ‘ऑनलाइन बुकिंग अॅप’ विकसित केले आहे. पुणे आणि सोलापूरच्या



आसपासच्या भागात अनेक प्राणी आणि पक्षी दिसतात. वनविभागाने गावकरी आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांना बरोबर घेऊन परिसरातील वन विकासासाठी पर्यटन आराखडा तयार केला आहे. स्थानिक ग्रामस्थांना वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रशिक्षण व्यवस्थापन कौशल्ये आणि पर्यटक मार्गदर्शक देण्यात आले आहेत. गवताळ प्रदेशाचे व्यवस्थापन हादेखील या सफारीमागील एक उद्देश आहे. या उपक्रमाचा उद्देश परिसरात रोजगार वाढवणे, संवर्धन कार्यक्रमात नागरिकांचा सहभाग वाढवणे हादेखील आहे. हे हरित क्षेत्र काळवीट, चिंकारा, ससा, लांडगा, कोल्हा, हायना यासारख्या तृणभक्षी व मांसभक्षी प्राण्यांसाठी महत्त्वाचे आहे. इंदापूर तालुक्यातील कडबनवाडी आणि बारामती तालुक्यातील शिर्सुफळ या दोन ठिकाणांपासून गवताळ सफारीला सुरुवात होत आहे. प्रादेशिक वनक्षेत्रात आम्ही ही गवताळ प्रदेश सफारी सुरू केली आहे. या सफारीसाठी लागणारी वाहने लवकरच उपलब्ध होतील. पण सध्या आम्ही पर्यटकांना त्यांच्या वाहनातून या सफारीसाठी प्रवेश देणार आहोत, असे पुणे वनविभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते म्हणाले.